महाबीज

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित,

मुख्य कार्यालय : महाबीज भवन : कृषिनगर, अकोलाः ४४४ १०४.

(CIN):-U०१२००MH१९७६SGC०१८९९० E-mail: hoadmin@mahabeej.com

संदर्भ क्र.महाबीज/प्रशासन/सहायक/२०२३/ 1153 दि.०३ /०८/२०२३

ई-मेल द्वारे

## परिपत्रक

**विषय :- जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/ क्षेत्र अधिकारी या संवर्गाची दि.०१.०४.२०२२ रोजीची अंतिम सेवा ज्येष्ठता सूची (Final Seniority List) प्रसिध्द करणेबाबत.**

संदर्भ:- १.या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.महाबीज/प्रशासन/सहायक/सु.प्रा.से.ज्ये.सू./२०२३/९७६ दि.०७/०७/२०२३.
२.या कार्यालयाचे सुनावणी पत्र जा.क्र.महाबीज/प्रशासन/सहायक/२०२३/११०७ दि.२४/०७/२०२३.

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये **जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/ क्षेत्र अधिकारी** या संवर्गाची सुधारीत प्रारुप सेवा ज्येष्ठता सूची (Revised Provisional Seniority List) प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच संबंधित विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख/ नियंत्रण अधिकारी यांना सदर यादी आपले अधिनस्थ अधिकारी/कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणून/प्रसारित करुन त्या अनुषंगाने संबंधितांचे आक्षेप/हरकती/सूचना/विनंती **दि.१८.०७.२०२३** पर्यंत सादर करणेबाबत निर्देशीत करण्यात आले होते.

त्यानुसार यासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-१** प्रमाणे आक्षेप/हरकती प्राप्त झाल्या असून त्याचे निराकरण करण्यासाठी संदर्भीय क्र.२ वरील पत्रान्वये **दि.२६/०७/२०२३** रोजी संबंधीतांची सुनावणी घेण्यात आली आहे. सदरील सुनावणी व पडताळणी अंती महाबीज सेवा नियम-१९९५ च्या नियम १६ नुसार **जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/ क्षेत्र अधिकारी** या संवर्गाची दि.०१.०४.२०२२ रोजीची अंतिम सेवा ज्येष्ठता सूची (Final Seniority List) याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे.

कार्यालय प्रमुख (सर्व)/ नियंत्रण अधिकारी (सर्व) यांना निर्देशीत करण्यात येते की, संबंधीत संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांचे संवर्गाची अंतिम सेवा ज्येष्ठता सूचीची (Final Seniority List) एक प्रत देण्यात यावी. तसेच एक प्रत आपले कार्यालयात कायमस्वरुपी जतन करण्यात यावी.

सदर अंतिम सेवा ज्येष्ठता सूची (Final Seniority List) महामंडळाचे अधिकृत संकेतस्थळ www.mahabeej.com वर सुध्दा सर्व संबंधितांच्या माहितीसाठी उपलब्ध/प्रसिध्द करण्यात येत आहे.

म.रा.बि.म.मर्यादित करिता,

**(टिपणी मा.व्य.सं.कडून मान्य)**

(डॉ.प्रफुल्ल लहाने)
महाव्यवस्थापक (प्रशासन)

<u>प्रतिलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव:-</u>

१. सर्व विभाग प्रमुख, मराबिम मर्यादित.............................................
२. सर्व विभागीय व्यवस्थापक/उपविभागीय व्यवस्थापक,मराबिम मर्या.............
३. सर्व जिल्हा व्यवस्थापक, मराबिम मर्या..............................................
४. सर्व केंद्र अभियंता/केंद्र व्यवस्थापक, बिज प्रक्रिया केंद्र.........................
५. मा.व्यवस्थापकीय संचालक यांचे स्विय सहायक यांना माहितीस्तव.
६. संबंधीत नस्ती/वैयक्तीक नस्ती.

# परिशिष्ट-१

**दि.०१/०४/२०२२ रोजीच्या सुधारीत प्रारुप सेवा ज्येष्ठता सूची (Revised Provisional Seniority List) चे अनुषंगाने जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/ क्षेत्र अधिकारी या संवर्गातील प्राप्त आक्षेप/हरकती/सूचना/विनंतीचे विवरण**

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव पद कार्यरत ठिकाण | आक्षेप/हरकतीचे स्वरूप | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|---|
| १ | **मोहकर सुरेश रामजी,** जि.व्य.श्रेणी-२, जालना. | स्वत:चे आडनाव "मोहोकार" ऐवजी "मोहकर" असे दुरुस्त करण्यात यावे. | विनंती अर्जानुसार स्वत:चे आडनावात दुरुस्ती करुन नोंद घेण्यात आलेली आहे. आक्षेप मान्य करण्यात आला आहे. |
| २ | **देवानंद मोतीराम जांगळेकर,** जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२, नांदेड. | रुजु दिनांक सुधारीत-दि.०८.०८.२०१६ अशी नोंद घेण्यात यावी. | कार्यालयीन दस्तऐवज पडताळणी करण्यात आले असून रुजू दिनांकात सुधारणा करण्यात आली आहे. आक्षेप मान्य करण्यात येत आहे. |
| | | दि.२६/०७/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीचे अनुषंगाने कार्यवाहीचा तपशील | |
| | | कृ.क्षे.अ.या पदावर दि.०२.१२.१९९९ रोजी नियुक्ती झाली असून, विभागीय कार्यालय (आं.प्र.) येथे महामंडळाच्या सेवेत कार्यरत असताना दि.०२.०८.२०१६ रोजी जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२ या पदाचे नियुक्ती आदेश प्राप्त झाले होते. त्यावेळी आवंटीत केलेली सर्व कामे पूर्ण करुन वरिष्ठांचे परवानगीनंतर दि.०८.०८.२०१६ रोजी मुख्य कार्यालय, अकोला येथे जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२ या पदावर रुजू झालो आहे. कामाच्या व्यस्ततेमुळे विभागीय व्यवस्थापक, कर्नुल (आं.प्र.) यांनी परवानगी दिली नसल्याने लगेचच जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२ या पदावर रुजू होणे शक्य नव्हते. त्यामुळे नियुक्ती आदेशाची दि.०२.०८.२०१६ ही नियुक्तीची तारीख गृहीत धरुन त्यानुसार सेवा ज्येष्ठता निश्चीती करण्यात यावी. | १.दि.०७/०७/२०२३ रोजी जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/क्षेत्र अधिकारी संवर्गाची दि.०१/०४/२०२२ रोजी सुधारीत प्रारुप सेवा ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्यात आली असून, सदर सेवा ज्येष्ठता सूची महाबीज सेवा नियम १९९५ चे नियम १६ नुसार प्रसिध्द करण्यात आली आहे.<br>२.प्रसिध्द करण्यात आलेली प्रारुप सेवा ज्येष्ठता सूची नियमानुसार निवड यादी/ गुणवत्ता यादीप्रमाणे असून, त्यामध्ये नमुद केलेला रुजू दिनांक हा पदावर प्रत्यक्ष रुजू झाल्याप्रमाणेच असल्यामुळे श्री.जांगळेकर यांनी उपस्थित केलेला मुद्दा नियमाला धरुन नसल्यामुळे त्यांचा आक्षेप फेटाळण्यात येत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कृ.क्षे.अ. या पदावर दि.०२.१२.२०११ रोजी सेवेची १२ वर्ष पूर्ण झाल्यानंतर **दि.०२.१२.२०११** पासून सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात आला असून त्या अनुषंगाने जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२ या पदाची वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. दि.०८.०८.२०१६ रोजी सरळसेवेतून जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२ या पदावर रुजू झाल्यानंतर वरिष्ठ वेतनश्रेणीचा कोणताही लाभ देण्यात आला नाही. | १.कृ.क्षे.अ. या पदावरील १२ वर्षांच्या नियमित सेवेनंतर आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ लागू होऊन वरीष्ठ पदाची (जि.व्य.श्रे.-२/क्षे.अ.) वेतनश्रेणी मंजूर असतानासुध्दा श्री.जांगळेकर यांनी स्वेच्छेने जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/ क्षेत्र अधिकारी या संवर्गात सरळसेवेने नियुक्तीचा मार्ग निवडलेला आहे.<br>२.श्री.जांगळेकर हे सरळसेवेने जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/ क्षेत्र अधिकारी या पदावर दि.०८.०८.२०१६ रोजी रुजू झाले आहेत. तथापि, श्री.जांगळेकर हे महामंडळाचे कर्मचारी असल्यामुळे त्यांचे कृ.क्षे.अ. पदावरील त्यांचे वेतन संरक्षित करण्यात आले आहे. परंतु, जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/ क्षेत्र अधिकारी या संवर्गातील वेतनश्रेणीत ते यापुर्वीच वेतन आहरीत करीत असल्यामुळे त्यांना जि.व्य.श्रे.-२/क्षे.अ. या पदाच्या वेतनाचा आर्थिक लाभ देय झाला नाही. |
| | | कृ.क्षे.अ. या पदावर **दि.०२.१२.२०२३** सेवेची २४ वर्ष पुर्ण होणार आहेत. त्यामुळे कृ.क्षे.अ.या पदाची सेवा ज्येष्ठता गृहीत धरण्यात यावी. जेणेकरुन अनुज्ञेय असणाऱ्या वरिष्ठ वेतनश्रेणीच्या अनुषंगाने होणारे आर्थीक नुकसान टाळता येईल. | **वित्त विभाग शासन निर्णय दि.०१ जुलै, २०११ अन्वये** सरळसेवा / नामनिर्देशनाने नियुक्तीपुर्वीची सेवा सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेच्या पहिल्या/ दुसऱ्या लाभासाठी ग्राह्य धरता येणार नाही असे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/क्षेत्र अधिकारी या संवर्गात सरळसेवेद्वारे रुजू होणेबाबतचा निर्णय श्री.जांगळेकर यांनी स्वेच्छेने घेतला असल्यामुळे त्यांचा आक्षेप फेटाळण्यात येत आहे. |
| | | **श्री.डी.बी.पिंजरकर** व **श्री.आर.आर.आर.राठोड** या कृ.क्षे.अ. यांचेपेक्षा सेवाज्येष्ठ आहे. तसेच **श्री.एस.एस.सावरकर,** जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२ हे सरळसेवा भरती प्रक्रिया २०१६ मधून महामंडळाचे सेवेत दि.०८.०८.२०१६ रोजी नव्याने रुजू झाले असूनसुध्दा या तिघांचेही सेवा ज्येष्ठता स्थान माझ्यापेक्षा आधीचे आहे. त्यामुळे सदरील निवेदनाचा विचार करुन न्याय देण्यात यावा. | जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/ क्षेत्र अधिकारी या पदाच्या भरतीसाठी महामंडळात कार्यरत किंवा बाहेरील विहीत शैक्षणिक पात्रता व अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांची लेखी परिक्षा व मुलाखतीद्वारे निवड करण्यात आली आहे. त्यानुसार निवड यादी/गुणवत्ता यादी प्रमाणे सेवाज्येष्ठता यादी मध्ये स्थान देण्यात आले आहे. कृषि क्षेत्र अधिकारी व जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/ क्षेत्र अधिकारी हे दोन्ही स्वतंत्र संवर्ग असल्यामुळे या संवर्गांच्या सेवा ज्येष्ठता यादींची एकमेकांशी सांगड घालण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. श्री.जांगळेकर यांनी उपस्थित केलेला मुद्दा नियमाला धरुन नसल्यामुळे त्यांचा आक्षेप फेटाळण्यात येत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सुधारीत प्रारुप सेवा ज्येष्ठता सूची दि.०७.०७.२०२३ रोजी प्रसारित करण्यात आली असून माझा परिविक्षाधीन कालावधी दि.०८.०८.२०१९ रोजी संपुष्टात आला आहे. त्यामुळे सेवा ज्येष्ठतेसंबंधी महाबीज सेवा नियम-१९९५-१६ (i) (e) गृहीत धरण्यात येवू नये. तसेच महाबीज सेवा नियम-१९९५-१६ (i) (d) नुसार वयाने ज्येष्ठ असल्यामुळे **श्री.पिंजरकर, श्री.राठोड** व **श्री.सावरकर** यांचे आधी सेवा ज्येष्ठतेमध्ये स्थान देण्यात यावे. | १.श्री.जांगळेकर व श्री.सावरकर यांचा परिविक्षा कालावधी २ वर्षांचा होता. परंतू त्यांच्या परिविक्षा कालावधीत १ वर्षाची वाढ करुन त्यांना **दि.०८.०८.२०१९** रोजी १ वर्ष उशीराने जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/ क्षेत्र अधिकारी या पदावर महामंडळाचे सेवेतील **स्थायीकरण** झाले आहे. त्यामुळे त्यांची सेवा ज्येष्ठता महाबीज सेवा नियम १९९५ चे नियम १६ (i) (e) नुसार निश्चित करण्यात आली आहे.<br>२. श्री.पिंजरकर व श्री.राठोड यांचे स्थायीकरण दोन वर्षांचा परिविक्षा कालावधी यशस्वीरित्या पुर्ण झाल्यानंतर विहीत तारखेस **दि.०६.०८.२०१८** रोजी झाले आहे. त्यामुळे श्री.पिंजरकर व श्री.राठोड हे श्री.जांगळेकर यांचेपेक्षा सदर पदावर सेवाज्येष्ठ ठरतात.<br>३. श्री.सावरकर हे श्री.जांगळेकर यांचेपेक्षा वयाने लहान असले तरी मुळ निवड यादी/ गुणवत्ता यादीतील श्री.सावरकर यांचे स्थान श्री.जांगळेकर यांचे वर असून श्री.सावरकर यांचे गुण सुध्दा श्री.जांगळेकर यांचेपेक्षा अधिक आहेत. तसेच महाबीज सेवा नियम-१९९५-१६ (i) (d) येथे लागू होत नसल्यामुळे जन्मतारखेच्या आधारे सेवाज्येष्ठतेचे स्थान निश्चीत करता येणार नाही. सबब, श्री.जांगळेकर यांनी उपस्थित केलेला मुद्दा नियमाला धरुन नसल्यामुळे त्यांचा आक्षेप फेटाळण्यात येत आहे. |

**महाव्यवस्थापक (प्रशासन)**
**म.रा.बि.म.मर्या., अकोला**

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला

## दि.०१.०४.२०२२ रोजीची अंतिम सेवा ज्येष्ठता सूची

** संवर्ग/पदनाम : जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/ क्षेत्र अधिकारी गट-ब वेतनश्रेणी-एस-१५-४१८००-१३२३००

| अ. क्र. | ज्येष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव | जात प्रवर्ग | जात | जन्म दिनांक | नियुक्तीचा मार्ग व प्रवर्ग | रुजू दिनांक | गृहजिल्हा | शैक्षणिक पात्रता | सेवा निवृत्ती दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | फुलझेले अजय जयपालराव | अजा | महार | 6-Dec-1971 | पदोन्नती-अजा | 3-Nov-2008 | चंद्रपूर | M.Sc.(Agril) | Dec-2029 | |
| २ | २ | मोहकर सुरेश रामजी | अज | आंध | 9-Mar-1970 | पदोन्नती-अज | 8-Nov-2008 | यवतमाळ | B.Sc.(Agril) | Mar-2028 | |
| ३ | ३ | गिरी जगदीश भीमाशंकर | भज-ब | गोसावी | 18-Oct-1965 | पदोन्नती-भज-ब | 16-Jan-2009 | औरंगाबाद | B.Sc.(Agril) | Oct-2023 | |
| ४ | ४ | देवरामणी गोपाळकृष्ण हनुमप्पा | अज | नायका | 21-Jul-1973 | पदोन्नती-अज | 1-Mar-2011 | धारवाड (कर्नाटक) | B.Sc.(Agril) | Jul-2031 | |
| ५ | ५ | अल्लमवार शंकर सायन्ना | अज | मन्नेरवारलू | 1-Jun-1975 | सरळसेवा-अज | 22-Sep-2011 | नांदेड | M.Sc.(Agril) | May-2033 | |
| ६ | ६ | पिंजरकर दीपक बबनराव | इमाव | माळी | 9-May-1984 | सरळसेवा-खुला | 6-Aug-2016 | अमरावती | M.Sc.(Agril) | May-2042 | महाबीज सेवा नियम १९९५ चे नियम १६ (i) (b) नुसार ज्येष्ठता क्रम देण्यात आला आहे. |
| ७ | ७ | राठोड रामबल रामप्रसाद | विजा-अ | बंजारा | 6-Jul-1984 | सरळसेवा-खुला | 6-Aug-2016 | अकोला | B.Sc.(Agril) | Jul-2042 | |
| ८ | ८ | चव्हाण अरुण दशरथ | विजा-अ | बंजारा | 8-Aug-1973 | सरळसेवा-विजा-अ | 9-Aug-2016 | वाशिम | M.Sc.(Agril) | Aug-2031 | |
| ९ | ९ | सावरकर सागर सुरेश | इमाव | माळी | 4-Aug-1985 | सरळसेवा-खुला | 8-Aug-2016 | अकोला | M.Sc.(Agril) | Aug-2043 | महाबीज सेवा नियम १९९५ चे नियम १६ (i) (e) नुसार ज्येष्ठता क्रम देण्यात आला आहे. |
| १० | १० | जांगळेकर देवानंद मोतीराम | अजा | बौध्द | 6-Sep-1973 | सरळसेवा-अजा | 8-Aug-2016 | वर्धा | M.Sc.(Agril) | Sep-2031 | |
| ११ | ११ | घावडे प्रशांत मोतीरावजी | इमाव | माळी | 23-Jun-1988 | सरळसेवा-इमाव | 10-Sep-2018 | यवतमाळ | M.Sc.(Agril), Ph.D.(Horti) | Jun-2046 | |
| १२ | १२ | पारडे निर्मल संपतराव | अजा | खाटीक | 4-Nov-1983 | सरळसेवा-अजा | 1-Sep-2018 | अकोला | M.Sc.(Agril), Ph.D.(Agri. Biotech.) | Nov-2041 | |

महाव्यवस्थापक (प्रशासन)